पुढारी MY कोल्हापूर मंगळवार, ६ फेब्रुवारी २०२४



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ मराठी गुणवंत शिक्षक पुरस्कार स्वीकारताना विवेकानंद कॉलेजचे प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर. सोबत मान्यवर.

# प्रा. एकनाथ आळवेकर यांना शिवाजी विद्यापीठ गुणवंत शिक्षक पुरस्कार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाच्या वतीने दिला जाणारा यावर्षीचा शिवाजी विद्यापीठ मराठी गुणवंत शिक्षक पुरस्कार विवेकानंद कॉलेजचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांना प्रदान करण्यात आला. क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड कॉलेज कुंडल येथे 'शिविम'च्या १३ व्या अधिवेशनात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मराठी साहित्य संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील मराठी विषयाच्या प्राध्यापकाला हा पुरस्कार दिला जातो. आळवेकर यांचे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्रबंधक आर. व्ही. जोग यांनी अभिनंदन केले.